# जिव्हाळी

गुणाकर देशपांडे

REFBK-0008087

REFBK-0008087

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२९७३ वि: काव्य
क्रमांक १५४८ नों दि: ५।१।६२

शिरीष प्रकाशन, नागपूर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32903 वि: काव्य
क्रमांक 9५४८ नों: दि: ५।१।६२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 6060

REFBK-0008087
REFBK-0008087

# जिव्हाळी

गुणाकर देशपांडे

मूल्य अडीच रुपये

शिरीष प्रकाशन, धरमपेठ, नागपूर १.

प्रकाशक :
संजय गुणवंत देशपांडे,
धरमपेठ, नागपूर १.

मुद्रक :
क. वि. प्रयागी
सुबोध सिंधू मुद्रणालय,
नागपूर १

प्रथमावृत्ति : विजयादशमी १९६१

एकमेव वितरक :
बॉम्बे बुक डेपो,
२१७, चर्नी रोड
गिरगांव, मुंबई ४

तीर्थरूप

बाबासाहेब

आणि

सौ. ताईस –

# प्रस्तावना

श्री. गुणाकर देशपांडे यांची कविता नवोदित कवींच्या निर्मितीमध्ये उठून दिसणारी आहे. त्या निर्मितीकडे दक्षतेने पाहणाऱ्या मराठी काव्यरसिकांच्या ती परिचयाची आहे. १९५२–५३ सालापासून ती मराठी नियतकालिकांत प्रसिद्ध होत आली आहे आणि तेव्हांपासूनच तिने जाणत्यांचें लक्ष वेधलें. पण गुणाकर देशपांडे यांच्या आतांपर्यंतच्या सर्व कविता या संग्रहांत एकत्रित स्वरूपांत समोर आल्यावर त्यांचा वेगळाच, स्पष्ट ठसा रसिकमनावर उमटल्याखेरीज राहणार नाही.

उत्कट अनुभूतीच्या अभिव्यक्तीचा प्रयत्न करणाऱ्या नवोदित कवींच्यापुढे कांही वेगवेगळे, कमीअधिक रुळलेले मार्ग असतात. ते उभे असतात त्या बिंदूपासून कांही कालचे असतात, कांही परवांचे, कांही समकालीन. त्या सर्वांचा त्यांच्या मनावर कमीअधिक संस्कार झालेला असतो. त्यांचा जाणतेपणीं वा नेणतेपणीं समन्वय करून त्यांतून त्या कवींना स्वतःचा मार्ग, स्वतःचा स्वर व स्वतःचा शब्द शोधायचा असतो. ज्यांना हा शोध सहज लागण्याइतकी प्रतिभा लाभते त्यांची कविता एकदम उठून दिसते; ती रसिकांचें चित्त ओढून घेते.

गुणाकर देशपांडे यांच्या कवितेला हें साधलें आहे असें दिसेल.

गुणाकर देशपांडे यांना काव्यवृत्तीचा वारसाच लाभला आहे. 'निवेदन' या कवितासंग्रहामुळे महाराष्ट्राला सुपरिचित असणारे गुणवंत हनुमंत देशपांडे यांचे ते चिरंजीव. वडिलांच्या शब्दकळेंतील सूचकता आणि अभिजातपणा गुणाकरांनाहि लाभला आहे. या वडिलार्जित वाक्संपदेचा विनियोग मात्र ते स्वतःच्या अनुभूतीप्रमाणे आणि अभिव्यक्तीच्या निकडीप्रमाणे करतात. आपल्या वडिलांच्या काव्यलेखनाप्रमाणे गुणाकर देशपांडे यांचेहि आतांपर्यंतचें लेखन मोजकें आहे. भौगोलिक विभागांप्रमाणें कवींची वर्गवारी करणें समीक्षणाच्या दृष्टीने विशेष शास्त्रीय समजलें जाणार नाही. परंतु तें कधींच रास्त नसतें असेंहि नाही. कधीं-कधीं अशा वाङ्मयीन घटना होतात कीं ज्यांच्यामुळे त्या निर्मितीचा आपल्या परिसराशी कांही अविच्छेद्य संबंध आहे का काय, हें शोधणें प्राप्त होतें. आजच्या मराठी कवितेची पाहणी करतांना जुना महाराष्ट्र आणि आजचा विदर्भ या दोन विभागांत निर्माण होणाऱ्या कवितेंत अशीच कांही तरी प्रकृतिभिन्नता कोणाला आढळून आल्यास नवल नाही. त्या भिन्नतेची थोडी गंमतीची बाजूहि असावी. विदर्भांतील बहुतेक कवि कधींकाळीं, सटीसामासीं एखादी कविता लिहिणारे आहेत. ते

काव्य जगत असले तरी काव्यलेखनाची त्यांना घाई नसते; काव्यप्रकाशनाची तर नसतेच. गुणाकर देशपांडे यांच्या या संग्रहांत आठ वर्षांतील उण्यापुऱ्या ४४ कविता आहेत. १९५४ मध्ये त्यांची कविता चांगली बहरांत आलेली दिसते. पण लागलीच १९५५ मध्ये केवळ एक कविता लिहिली गेली व १९५६ साल तर पूर्ण कोरडें गेलेलें दिसतें. १९५७ नंतर मात्र या प्रतिभेला पुन: बहर आला असावा. श्रावणांतल्या सकाळचें पिवळें सौंदर्य तिला जाणवूं लागलें, ग्रामीण जीवनांतील लहान लहान प्रसंग रिझवूं लागले आणि 'साफल्य' सारखी प्रसन्न कविता व 'फुंकर' सारखा व्याकुळ उद्‌गार पेलण्याचें सामर्थ्य तिला प्राप्त झालें.

गुणाकर देशपांडे यांची कविता मोजकी आहे, म्हणूनच कीं काय ती गुणवती आहे, प्रारंभापासूनच तिला रेखीव आकार, सहज शब्दकळा लाभली. ती सूचक असूनहि पारदर्शी आहे. संवेदनांची सूक्ष्मता व्यक्त करण्याचें आणि अनुभवाचे पापुद्रें उकलण्याचें तिचें कसब वाखाणण्यासारखें आहे. या कवितेंत नसता आव आणलेला नाही. तिथे प्रेमांत पडल्याचें सोंग नाही किंवा प्रेमभंगाचें ढोंग नाही; भावनेची थट्टा नाही किंवा तिच्या आहारीं जाणेंहि नाही. म्हणूनच तिच्या ऐन बहरांतहि ती नाजुक आणि संयत आहे; केवळ खोल स्पंदनानेच चटका लावणारी आहे.

आंतरिक भावस्पंदाचे चैतन्य जेव्हा लाभत नाही तेव्हां मात्र ही कविता निष्प्राण ठरते, कोरडी पडते. कमावलेल्या कसबाचा प्रयोग करून पाहणाऱ्या, किंवा कदाचित् चालू प्रवाहाचें वळण वळवून पाहणाऱ्या तीन चार कविता या संग्रहांत सांपडतील. पण त्या तेवढ्याच कोरड्या काळांतल्या. तो मार्ग लागलीच सोडून दिलेला दिसतो. गुणाकर देशपांडे यांची बाकीची सर्व सच्ची कविता कितीतरी आकर्षक आहे! ती नाजूक आहे तशीच विविधहि आहे. तींत निसर्गचित्रें आहेत, ग्रामीण जीवनाची प्रत्ययकारी अभिव्यक्ति आहे, प्रसंगचित्रणाच्या रूपाने उभे राहणारे अनुभवाचे क्षण, वृत्तींचें स्पंदन आहे. पण गुणाकर देशपांडे यांच्या काव्याचा उत्कर्षबिंदु १९५७-१९५८ मधील त्यांच्या 'मोहोर', 'निशा', 'कर्दळी', 'साफल्य', 'फुंकर' इत्यादि कवितांत आहे, असें वाटल्यावाचून राहत नाही. या कविता आत्मलक्षी आहेत. कवीच्या मनाच्या गाभाऱ्यांतील उत्कट भाववेला सहजसुंदर रूप घेऊन आपोआपच जणु उभ्या राहिल्या आहेत. कधीं त्यांनी अदृश्याशी संभाषणाचें रूप घेतलें, कधीं प्रतीकाचें रूप घेतलें, कधीं केवळ सहजोग्दाराचें. त्यांनी आपली प्रतिमासृष्टि निर्माण केली आणि आपला तालहि.

या लहानशा संग्रहांत कवीच्या काव्यविकासाचीहि चुणुक मिळते. त्यासाठी 'अमूर्त' (१९५४)

आणि 'अचानक' (१९६१) या कवितांची तुलना करून पाहणें उपयोगाचें होईल. 'अमूर्त' मध्ये जें घडून गेलें त्याचा सरळ, साधा आठव आणि कथन-प्रधान पुनःप्रत्यय आहे. 'अचानक' या कवितेंत भावानुभूतीच्या प्रौढत्वामुळे एक आशयघन प्रतीक निर्माण झालें. त्या प्रतीकाचा कवितेच्या प्रारंभा-पासून शेवटपर्यंत मागोवा घेतला गेला. त्यांत 'अमूर्त' मधली अल्पवयी, कोवळी, कथनबहुल आणि संस्मरणांतच आनंद मानणारी वृत्ति उरली नाही. वास्तवावर मात करून अंतरांतच ऐक्य अनुभवणारी भावनेची परिपक्वता येथे लाभली आहे. तिच्यामुळे कविता सुबद्ध झाली, एकदम प्रौढ बनली.

गुणाकर देशपांडे यांच्या कवित्वशक्तीचा असाच उत्तरोत्तर विकास होऊन त्यांच्या हातून मराठी कवितेंत मोलाची भर पडावी, अशीच रसिकांची इच्छा असणार.

नवी-दिल्ली<br>२८-८-६१.

कुसुमावती देशपांडे

———

# जिव्हाळी

खुळया जळाची कळी खुलावी
जशि वाऱ्याची झुळुक लागुनी
तशी माझिया मनीं जागती
तरल कंपनें तुला पाहुनी.

त्या लहरींतिल अधीर तगमग
हलवुन जाते मुग्ध लव्हाळी
खोल खोल हृदयांत मुळाशी
स्पर्शुन जाते मुकी जिव्हाळी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८०८६
स्थळ प्रत

# बंदिस्त !

शब्दावाचून बंदिस्त
आज प्रक्षुब्ध भावना
तिला वाटते तोडावे
साऱ्या कृत्रीम बंधना.

क्षीण पंख जाहलेलें
ओढ झेप मारण्याची
घाली भुरळ घरटे
तृषा निलिमा पिण्याची.

वेग अनावर परी
बद्ध जळ कातळांत
किनाऱ्याच्या सीमेवरी
फुटे लाटेवर लाट.

१९५३

# नको !

स्वप्नांच्या छायेत अशी
नको बेसावध फिरूं
लागतील आपसूक
तुझें नयन पाझरूं !

उगा पाण्याशी ग खेळूं
नको किनारीं बसून
तळव्यांना चुंबुनिया
जळ जाईल वाहून !

इंद्रधनुष्याचें रंग
नको पाहूं लोभावून
वितळेल किमया ती
ढग जाताच उडून !

आतं गीत लकेरीनं
नको जाऊं वेडावून
घाव हृदयीं घालून
सूर जातील उडून !

स्वप्नछायेंत म्हणून
नको बेसावध फिरूं
आणि आपुलेंच मन
नको नकळत चिरूं !

१९५३

# पोरकें रे ! मन

जंजाळांत इथल्या ह्या
तुझें पोरकें रे ! मन
हसेल का कुणाच्याश्या
ओठीं हास्यास पाहून !

झळ लागून उन्हाची
कळी कोवळी सुकतां
रसरसेल कां पुन्हा
पाणी वरचें घालतां ?

रस खोलांत आटतां
कशी पालवी फुटावी !
काय करील वसंत ?
आस कोणती जगावी ?

मूक दु:खास फुटेना
शब्द कोरड्या दयेने
गहिवरेल का गळा
औपचारिक स्पर्शाने ?

सावलीच्या शोधासाठी
जगे कासावीस प्राण
जंजाळांत इथल्या ह्या
तुझें पोरकें रे ! मन.

१९५३

# तूं .... मी ....

तूं अपुल्या दृष्टीतुन भावगंध उधळावे
मी अपुल्या गीतांतुन हृद्गत तुज सांगावें
तूं साध्या शद्बांतुन अर्थ नवे काढावे
मी बोलुन कांहितरी जगताला फसवावें.

तूं 'जा' मज म्हणतां मी जागिच त्या अडकावें
मी 'जातो' म्हणतां तव नयनिं अश्रु तरळावे
फिरफिरून 'ये, ये ना' फिर फिरून 'जा जा तूं'
फिर फिरून अंतरांत उत्कट कढ दाटावे.

१९५३

# मी शके ना

पेटते जें अंतरीं तें
दाखवूं तुज मी शके ना
वाहतें जें हृदय फोडुन
थांबवूं त्याला शके ना.

पीळ पडलेला मनाला
उकलुनी दावूं शके ना
वाटतें जें तीव्रतेने
तेंहि तुज सांगूं शके ना.

विसरण्याचा यत्न करतो
तेंच मी विसरूं शके ना
बोचतें जें शल्य जळतें
उपटुनी फेकूं शके ना.

जगवितें जें जीव माझा
तेंच मी जगवूं शके ना
ध्यास ज्याचा अंतराला
तेंच मी पकडूं शके ना.

१९५३

# एकच

सांगितल्याविण कळलें होतें
हृदयाची भाषाच वेगळी
शद्वांवाचुन अर्थ उमजलें
दृष्टी आली नवी आगळी.

ठाउक होते नुसते देणे
घेण्याची पण भ्रांतच नव्हती
परस्परांना पाहत होतो
स्वत:चीच पण शुद्धहि नव्हती

नव्हतें कांहि आणि भोवती
नव्हतें वर नभ, खाली धरती
नव्हती झाडी, नदी किनारा
गंहिवरलेली नीरव शांती

नव्हतें माहित संध्या किंवा
उषा नभाला चुंबित होती
नव्हतें माहित दिवस रात्र वा
जगास तेव्हां भुलवित होती.

होतें अंतर तेव्हां मिटलें
स्वर लहरींच्या दोन सुरांतिल
वायुविचितिल, दीप प्रभेतिल
पराग आणिक मधुगंधातिल.

होतें नुसतें एकच उरलें
दो हृदयांचें एकच स्पंदन
दोन मनांतिल एकच जाणिव
नील नभाचें जितें मुकेपण.

१९५४

क्रमांक ............ नों दि ...

# आण

अशी घातलीस आण
मन झालें पाणी पाणी
जीभ कापुनिया केली
काळजाची मुकी वाणी.

गळ घालून लाविलें
दुःख तसेंच गिळाया
वीष मिसळून दिलें
प्रीत-अमृत प्राशाया

साहूनहि अशी व्यथा
सोडावा न निश्वासहि
चोरासारखे वागावें
अंधारींहि, एकांतींहि

अशी घातलीस आण
फास घातला गळ्याला
वीष पाजूनिया शाप
जगण्याचा का ग ! दिला ?

१९५४

# अमूर्त !

कितीक दिन
सहवासीं अपुल्या
आपण होतो सुखांत पोहत.

परस्परांची नजर चुकवुनी
टक लावुनिया
पाहत होतो परस्परांना
दृष्टी मिळतां दृष्टींत परी
सहजच सारे
परस्परांना होतो सांगत
आपण होतो सुखांत पोहत.

उगीच काढुन काम कांहिसें
उगीच काढुन विषय निराळें
घटका घटका
क्षण न विसंबत
उगिच निरर्थक होतो बोलत
भान न राहुन
परी निसटतां शद्बांमधुनी
अंतरांतली

उत्कट जाणिव
चुकून घडलें, हें न तुझ्यास्तव
होतो आपण असें भासवित
आपण होतो सुखांत पोहत.

उगीच काढुन कांहि बहाणा
घडतें सारें सहज अभावित
असें दर्शवित
परस्परांना होतो स्पर्शित
चमकुन कोणी
अपुल्यापैकी, परी पाहतां
'तसें न कांहि त्यांत' भासवुन
दूर जवळुनी होतो सरकत
आपण होतो सुखांत पोहत.

भेट जराशी टळतां अपुली
उशिर लागतां जरा कुणाला
भांडत होतो
चिडतहि होतो
रुसतहि होतो
आणि कुणी मग
अपुल्यापैकी
जरा वळवितां

पाझरलेली नजर आपुली
'उगीचच सारें'
म्हणून होतो खदखद हासत
आपण होतो सुखांत पोहत.

परंतु नाहि कधिहि आपण
परस्परांना
सांगितलें कीं स्पष्टपणानें
'तुझीच मी रे !'
'तुझाच मी ग !'
'तुझ्यावाचुनी व्यर्थच जीवन'
'तुझ्या वाचुनी मीन जळाविण'
कधी न कथिलें अपुलें हृद्गत
तरिहि होतो सुखांत पोहत.

आणिक आतां
दूर दूर तूं निघून जातां
व्याकुळ होऊन
क्लेश न साहुन
रात्र रात्र भर करित जागरण
भरुन काढतो कितीक पानें
तेंच सांगण्या, तेंच सांगण्या
विश्वास मला

तूंहि असशिल तिथे बैसलिस
तुटणाऱ्या अंतरास लपवुन
फुटणाऱ्या हुंदक्यास अडवुन
ओघळत्या अश्रूंना रोखुन
शद्वांमध्यें अमूर्त कोरित
अमूर्त कोरित.

१९५४

# रात काजळी ....

रात काजळी, असे वादळी
भुतासारखा पिसाट वारा
भीषण शांती किरकिरणारी
गोटयासम बरसतात धारा.

अशा वादळीं एक झोपडी
भिंतींना सावरून धरुनी
तगून आहे प्राणपणाने
मृत्यूच्या पायास पकडुनी.

गवताचीहि शिवण उसवली
मोडुन पडलें वरचें आढें
कूड निखळला भिंतींवरचा
उडून गेलीं आणि कवाडें.

रिंगण धरुनी आंत नाचतो
सोसाटयाचा वादळवात
कुठें भिरंगत उडून गेली
दिवटीमधली जळकी वात.

नसलेला घेऊन निवारा
आंत बैसली आहे वृद्धा
थंड अचेतन परि कवटाळुन
जगण्यामधली असीम श्रद्धा.

अधीर आतुर कान ऐकण्या
कुठें कोंबडा देतो बांग
दृष्टीमध्ये प्राण साठले
उगवतीस कधि येइल जाग.

मनांत म्हणते 'सरता वादळ
जरा क्षितीजीं फुटता ओम
आवरीन हें खोपट अपुलें
शिविन उद्यां हें गवत तमाम'.

१९५४

# दिवेलागण

वारा कसा शांत होता
पानसुद्धां हालत नव्हतें
दिवेलागण झाली होती
सारीकडे कुंद होतें.

घरांतल्या अंधाराचे
डोळे लुक्लुक् करीत होते
हळूं हळूं नभांतही
ग्रह तारे दिसत होते.

गुरें घरीं आली होती
धूळ आतां शमली होती
बांधलेली गाय वत्सा
केविलवाणी बघत होती.

काम धाम करून बाया
आतां घरीं आल्या होत्या
हुश्श ! करून अंगणांतच
लेकरांना पाजीत होत्या.

चुलींत अजून धूर नव्हता
घड्यांत अजून नव्हते पाणी

मनांत कांही बेत नव्हते
घरांत नव्हते घरधनी.

वाटा पुऱ्या दिसत नव्हत्या
झावळ झावळ झालें होतें
तरी डोळे सख्यासाठी
साऱ्या वाटा धुंडीत होते.

दिवसभर कष्टूनहि
काम त्यांचें संपत नव्हते
मनें घरीं गेलीं होती
पाय मात्र थिजत होते.

पोटासाठी बांधलेले
बंध अजून सुटत नव्हते
पिंजऱ्यांतच भावनेचे
अश्रूं गळून सुकत होते.

गात्र गात्र शिणलेलें
कांही कांही सुचत नव्हते
दिवेलागण झाली होती
सारीकडे कुंद होतें.

१९५४

# कळी

कळी झोपली आहे रे !
नको तिजला जागवूं
स्वप्न पापण्यावरचें
नको उगाच हालवूं !

दोन घटकांच्या स्वप्नीं
जीवा रमवूं दे तिला
गंध मातीचा पिवून
सारे विसरूं दे तिला !

उद्यां उमलेल तीच
गंध भरेल वाऱ्यांत
किती भ्रमरांच्यासाठी
जीवा लावील ती तात !

आणि कुणाच्या पूजेची
उद्यां वाट बघेल ती
हांसतच पायापाशीं
देईलहि प्राणाहुती !

कळी झोपली आहे रे !

१९५४

# निळी सावली

धुंद जाहल्या दिशा बघ सखी धूळ नभा भिडली
धरणीवर तापल्या मृगाची निळी सावली पडली.

दूर दुरूनी भिजून आला शुष्क कालचा वारा
गोड शिरशिरी उठवित वाहे चाटित उघडया शरिरा.

करून किलबिल सोडुन घरटें उडें नभीं पाखरूं
पिवून वारा उडवुन शेपुट हुंदडतें वासरूं.

वाट पाहुनी थकले सारे आज मनीं हर्षले
मेघ पाहुनी नयनीं त्यांच्या पाणी डबडबलें.

तयार माझी जमिन संपली कालच नांगरणी
आज पडूं दे पाऊस धरतो उद्याच मी पेरणी.

घाम गाळला मोती त्याचे खचित उद्यां होतील.
दिन दैन्याचे सरतिल मनिचे बेत फळा येतील.

म्हणेन ना मग पुन्हा, नेस ती ठिगळ लावली साडी
फेकुन दे मग जुनी पुराणी जीर्ण शीर्ण गोधडी.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 6060

तुझ्या कुशीतिल सोन्या माझ्या सुखांत वाढेल
बाग बगीचें अपुलें तोहि हसून फुलवील.

सोन्याचा दिन आज सखे ! ग सुखांत ह्या रंगू
तृप्त धरतिचे श्वास सुखाचे आपणहि हुंगू.

१९५४

[library stamp]

# ओढ

काम सरतां लागते
ओढ पायास घराची
क्षणाक्षणाने वाढते
उत्सुकता अंतराची.

अंग कष्टाने शिणलें
झपझप तरी चाल
'कधी पोचेन घरास
आज झाला फार वेळ.'.

आणि दिसतां डोळ्यांना
त्याच्या घराचें अंगण
कोणी दिसते का तिथे ?
शंका कुशंका घे मन.

त्याला पाहून दुरून
पोर अंगणीं खेळतें
दुडुदुडू धावुनिया
येई, पायीं बिलगते.

'बाबा आला, बाबा आला'
करी आनंदे हाकाटी

उचलून चुंबूनिया
घट्ट धरीतसे पोटी.

शद्ब ऐकून बाईल
येई धावत बाहेर
हात माखले पिठाने
पार गळाला पदर.

जाई जवळी तशीच
काढी डोईचें पागोटे
'जरा बसूं दे रे ! स्वस्थ'
उगा पोरासच दाटे.

'लई उशीरसा झाला
वाट कव्हाची पाहते
जरा येत जा लौकर
चिंता काळीज जाळते'.

तिच्या दृष्टीतील प्रीत
घेतो डोळ्यांनी पिवून
अंग भूईवर टाकी
तिज पाहतो हसून.

१९५४

# पाऊस

पाऊस असतो सुरू चालती जलधारांची गानें
अमृतांत त्या भिजत राहती तांबुस हिरवी पानें.

हळु झुळुकीतुन झरत राहतो शहारता गारवा
झटकित असतो भिजल्या अंगा पुष्पांचा ताटवा.

धूसर सांध्यप्रकाशीं सारे अंधुक पिंगट होतें
झाकळतां तम लगबग पक्षिण घरट्यामाजी शिरते.

जलबिंदूंनी तुळशिपासची सांजवात तडतडते
कंकणांतल्या प्रतिबिंबाची हळूच थरथर होते.

दृष्टीमधुनी उडती तेव्हां प्रीतीची पाखरें
कुठे अडकला सजण ! तयास्तव शोधाया बावरें.

आणि पडे मग अडकुन राजा घरांत भिंतीवरच्या
कशा कळाव्या कळा तयाला दुरावल्या हृदयाच्या.

१९५४

# सभ्यता

जरी वाटलें मनास कांही
उघड तरी ना कधि बोलावे
दंतपंक्ति दावून बेगडी
उपचाराने कर जोडावे.

मस्त स्वतःच्या झोकांतच अन्
कधि न दुज्याला ' कसें ' पुसावे
बघुन कुणाच्या नयनीं आसूं
तोंड लपवुनी पण हासावे.

रंगरंगोटीखाली अस्सल
त्वचा मूळची अन् लपवावी
घामाच्या वासांत मिसळुनी
सेंट, सुगंधी हवा करावी.

स्वार्थासाठी क्षुद्र आपल्या
गळें कुणाचेहि कापावे
हजार पापें पचवुन पोटीं
पुण्याचें पण स्तोत्र जपावें.

बसतां ठोकर कधी कुणाची
पुच्छ हालवित पदीं पडावे

निरपराध कुणि अगतिक दिसतां
उलटें त्याला उगिच डसावे.

अशी आपुली असे सभ्यता
सडकी आतुन वरून नकली
सावासम परि अजुन मिरविते
जरिहि शंभर पापें भरली.

१९५४

# फिरुन जन्म दे

मज फिरुन जन्म दे ह्या भूमींतच एकदा
मज पुन्हा झेलुं दे शिरावरी ह्या वज्रासम आपदा
मज धुळित लोळुं दे, पिऊं दे सूर्याची उष्णता
मज नांगरल्या धरणीचा गंध श्वसूं दे
स्पर्शु दे दंवातील आर्द्रता.

रस पिउनी धरतीचा रसरसत्या –
तृणपर्णातील जिवंत सळसळ मज अंतरांत साठवुं दे
खुडल्या पुष्पांच्या देठांतिल दूध
सरींमधि अश्रुंच्या गाठवुं दे.
मावळत्या त्या किरणशलाका तुटत्या ताऱ्यांच्या
मज मनावरी रेखूं दे
कळवळत्या त्या गीतलकेरी फुटत्या लाटांच्या
मज स्वरांत गुंफूं दे

मज गरल पिऊं दे नागांचे
मज चरण सेवुं दे संतांचे
अन् बोल फुटूं दे मग मजला
जे ऐकुन येइल मुक्यासही वाचा.
मज असें गाउं दे ऐकुनिया जें
स्तब्धच बसतिल वेदांतीलहि ऋचा.

१९५५

# सकाळ श्रावणांतली

सकाळ श्रावणांतली
हळदीने न्हाउनिया जणु
वधू लाजरी उन्हांत बसली

पीत उन्ह कोवळें
गोठाणावर पेंगत बसली
कळप करोनी गुरें
आणि तयांच्या करीत खोड्या
हुंदडताती मुलें.

म्हैस एक गर्भार
सुस्तच आहे अजून
अपुल्या पोटीं घेउन भार
जवळ बाभळीवरी बसोनी
न्याहाळते तिज घार.

बाळंतिण ओली
कोंबडी ठुमकत ठुमकत आली
चिवचिव करुनी टिपते दाणे
पिलें तिची भंवताली.

घागर डोईवर
घेउन जाई मंद गतीने
पाण्याला नदिवर
कुणब्याची पोर
चाल तिची पाहून थबकते
रस्त्यांतच खार.

तोंच येतसे सर
पिवळें पिवळें भिजून निघती
मनांतील केसर
श्रावणांतल्या सकाळचें अन्
रोमांचित अंतर.

१९५७

# मोहोर

मोहरले नखशिखांत
आठवांत गाठ पडे
अंतरांत एकांतीं
आज तुझी साथ घडे.

पाकळ्यांत साकळलें
सौख्याचें निखळें दंव
हृदयींच्या गंधांतुन
किलबिलुनी उठले रव.

हरित ललित धरतीला
कुरवाळित नभ झुकलें
मुग्ध तिच्या मौनांतुन
प्रीतिगीत झरझरलें.

आज ह्या उषेस असें
तृप्तीचें स्वप्न पडें
मोहरले नखशिखांत
आज तुझी साथ घडे.

१९५७

# निशा !

नीरवतेतुन निळ्या नभाच्या
उन्मनस्क ही निशा हिंडते
ताऱ्यांच्या डोळ्यांतुन तेव्हां
तिजवरती मृदु करुणा झरते !

आकुल होई स्पर्श वायुचा
फुटे हुंदका कळीकळींतुन
दूर कुठें अज्ञात मंदिरीं
जळे जोगिया मीरेवाचुन !

आणि निशा - शबरी ओटींतिल
म्हणे न्याहळित उष्टी बोरें
'दिसो एकदा कर तेजाचा
नयनांनो मग सुखें मिटा रे !

१९५७

# थट्टा !

नको अशी थट्टा करूं
सये ! अंतर तुटतें
शीर काढतां काढतां
पान कोवळें फाटतें

१९५७

# कर्दळी

आज माझ्या कर्दळीचें
फूल पिवळें फुललें
पाकळ्यांच्या वेष्ठनांत
लाल पराग झुललें

लाल मिष्कील पराग
त्यांनी स्पर्शिली पाकळी
हळू धक्याने तेव्हढ्या
माझी हालली कर्दळी.

आला दाटून मनांत
तिच्या वत्सल उल्हास
उमाळून आला तिच्या
अंतर्यामीचा सुवास.

परी अव्यक्तच जगा
तिच्या भावनेचा गंध
शाप असा कर्दळीला
परी फुलतसे तृप्त.

१९५७

# गानसमाधी

असं चांदणं पडावं
अशा झुळुका सुटाव्या
संथ नदीच्या पाण्यांत
अशा लहरी उठाव्या.

चंद्र पेंगत असावा
रात झोपली असावी
तिच्या काजळी बटांत
धुंद दाटली असावी.

संथ स्पंदन असावें
श्वास गंधांत भिजावें
मृदु स्पर्शांत सुरांचें
धुंद नर्तन चालावें.

ताल वाऱ्याने धरावा
लय धरेची लागावी
निळ्या आकाशाने तेव्हां
गान समाधी साधावी.

१९५८

# साफल्य

वेल चढे मांडवाला
निळी गर्दली सावली
उन्हाच्याहि डोळ्यांमध्यें
झरे आतां माया ओली.

हळु हळुवार वारा
स्पर्शे जपून तिजला
झालें अस्मान ठेंगणें
आज तिचीया भाग्याला.

अशा सुखभारें तिची
थरथरते जिवणी
साऱ्या स्मित फुलांमध्यें
सप्त सुरांची गोवणी.

आज साफल्य कौमुदी
तिज काढते न्हाऊन
नवनिर्मीती साधनीं
तिचें आकाशलें मन.

१९५८

# फुंकर

वळ माझ्या पाठीवरचें
पाहुं नको तूं पाहुं नको
जळ माझ्या डोळ्यांमधलें
पुसूं नको तूं पुसूं नको.

कळ माझ्या हृदयामधली
पिळूं नको तूं पिळूं नको
झळ माझ्या दुःखामधली
विझवुं नको तूं विझवुं नको.

गळ घालुन पीळ अतां
उकलुं नको तूं उकलुं नको
विरजवून वेदनेस
अलग मला काढुं नको.

वळ स्पर्शुन मी जगतों
जळ पिऊन मी फुलतों
कळ सोसुन मी हसतों
झळ साहुन लखलखतों.

गळ म्हणून घालुनिया
अलग मला काढुं नको
जळजळत्या जखमेवर
फुंकर तूं घालुं नको

१९५८

# पावसाची रात्र

पावसाची रात्र आहे.

झरणाऱ्या सरीमध्यें
अस्पष्टशी शीळ आहे.

वाहणाऱ्या वाऱ्यामध्यें
बोंचणारी धार आहे.

झोपल्या अस्वस्थतेचें
अंग भिजलेलें आहे.

धुसर आभाळ आहे.

दाटलेल्या अभ्रांमागे
पुसटशा चांदण्यांची
फिकटशी आभा आहे.

साठलेल्या अश्रूंमागे
आणि तिची प्रीत आहे.

पावसाची रात्र आहे.

१९५८

# हाड

जर्द पिवळी दुपार होती
गर्द सावली कुठेच नव्हती
तास न् तास चालले तरी
विहिर मात्र दिसत नव्हती.

काळीशार धरती होती
नभास मात्र भरती नव्हती
खोल खोल शिरले तरी
मुळास ओल मिळत नव्हती.

उघडें बोडखें डोंगर होतें
झाड नव्हतें, झुडुप नव्हतें
खरडुन खरडुन ओढले तरी
नदीस नाले मिळत नव्हते.

उदास होतें, भकास होतें
कुठेच हिरवे दिसत नव्हतें
रस्त्यांत मात्र एक कुत्रें
हाड चघळून चाखीत होते.

१९५८

# साद

पाहिले ना पाहिलेसें
करूनिया जाऊं नको.

ऐकले ना ऐकलेसें
करूनिया टाळूं नको.

लाजुनी गुज सांगतां–
सांगतां थांबूं नको

थांबशी तरि थांब, पण
थांबतां हासूं नको.

जावयाचें ? जा, परी तूं
वळुनिया पाहूं नको.

येउनी भलत्याच वेळी
साद पण देऊं नको.

तोडावयाचे ? तोड तरि, पण
तोडतां थांबूं नको.

जोडावयाचें ? जोड ना, पण
जोडतां थांबूं नको.

१९५८

# पाखरूं

सरावाने सरत जाते वाट तरी अजून पुढे जायचें आहे
ठरावाने ठरत जाते दिशा तरी अजून खूप बघायचें आहे
सोसायचें, जगायचें, रडायचें आणि गायचें आहे
माझें मन एक पाखरूं दिशादिशांतून उडत आहे

जाणीव नव्हती जेव्हां निघालों घरटें सोडून अंतराची
आपदांची, वादळांची, सौंदर्याची, कुरूपतेची
जाणीव नव्हती स्निग्ध, शामल, आर्द्र, प्रेमळ सावलीची
झळाळणाऱ्या वणव्याची अन् फसवणाऱ्या मृगजळाची

कधीं गेलो फुफाट्यांतून पंख पोळून करपून गेले
कधीं गेलों काट्यांमधून अंग सारें रक्ताळलें
कधीं गेलों ढगांमधून चांदण्यांतून पोहत पोहत
कधीं निळ्या आंबराईत झोपी गेलों गीत ऐकत

कधीं गेलों अंधारांतून ठेचा खात धडपडत
कधीं विजांच्या लखाखीने दिपून गेलों तेज बघत
धुवांधारींत कधीं भिजलों, कधी सुकलों कडक उन्हांत
कधीं झालों धुंद नाचत सौरभांतील गीतलयींत.

कधीं हरकलों मनीं ऐकून नदीकाठीं प्रेमकूजन
कधीं हबकलों एखाद्याचें फाटणारें हृदय बघून
कधीं फिरलों झाडाखालील रडणाऱ्या मुलाभोवती
कधीं अश्रू ढाळीत बघितल्या विझणाऱ्या जीवन ज्योती

आतां नाही अंधाराची थोडीसुद्धां भीति वाटत
आतां नाही उन्हाळ्याची थोडीसुद्धां झळ जाणवत
आतां नाही चांदण्याने मनाला ह्या भूल पडत
हिमवर्षावाने आतां नाही शरीर सारें गारठून जात.

आतां फक्त डोळ्यांपुढे अवकाशाचा विस्तार आहे
आतां फक्त किनाऱ्यांना शोधण्याचा ध्यास आहे
आतां फक्त एकच गाणे 'पुढे पुढेच जायचे आहे'
माझें मन एक पाखरूं वारा पिउन उडत आहे.

१९५९

# दुपार हिरवी

रसरसलेली दुपार हिरवी
हिरवें जंगल, हिरवी राई
हिरव्या हिरव्या पऱ्हाटीतुनी
कापुस वेचित हिरवी बाई.

हिरवी साडी, चोळी हिरवी
दंडावरची गोंदण हिरवी
गहिऱ्या तरण्या नजरेमधली
सावध चंचल हरिणी हिरवी.

बिल्वर हिरवें, किणकिण हिरवी
ओठावरची गुणगुण हिरवी
अंतरांत अन् अवघडलेली
उत्सुक आतुर प्रीती हिरवी.

सभोवतीची शांती हिरवी
ओहळांत पडछाया हिरवी
निःसंकोचें जळीं नाहते
मत्स्यकन्यका दुपार हिरवी.

१९५९

# चाहूल

कातर कंपित सांध्यक्षणांची
तगमग करिते मनास व्याकुळ
दिशादिशांतुन स्फुंदत काळी
शापभ्रष्ट कुब्जेची चाहुल.

थेंब थेंब ताऱ्यांनी ढाळी
व्यथा आपुली रात विव्हळुन
आणि इथें मी शोधित भिरभिर
अश्रु आपुला दंवबिंदूंतुन.

१९५९

# खोडी

नभांत चांदण्या उमलूं आल्या
गालांत लाटांच्या पडल्या खळ्या
वाऱ्यानें केली भलतीच खोडी
नेसतां संध्या सावरी साडी.

आरस्पानी नारिंगी रंग
बघून तळ्याचें शहारें अंग
सळ्‌कन आली वरती मासोळी
झाडींत चंद्राला पालवी झाकोळी.

चमकें काजवा झुडुपा आडून
मिष्कील डोळ्यांनी करीत खूण
बसलें पानांत पाखरूं लपून
तुझीहि दृष्टी लवली लाजून.

१९५९

# बीज

उमटत जाती पदचिन्हे ती काळ्या मातीवर
निश्चळ नीरव रात्रीमध्यें ताऱ्यांचा जागर
धूम्रवलयसम क्षितिजरेघ ती स्मृतींत, ना सापडे
अखंड फिरती मनीं वर्तुळें सोडवीत साकडे.

शांतच असतो मनांत सागर, येतें वादळ, विरतें
उठती पर्वत, खचती पुन्हां, धरती फिरतच असते
सूर्य कधीं ना हातीं येतो, विझुन उजळते वीज
गगन कोसळे, सुंदर परि तें पुन्हा उगवतें बीज

१९५९

# मौन

निळें जांभळें आकाश
संधिकालचा प्रकाश
मन हळुवार असें
स्पर्शे वर्षेचा आभास.

येई झुळुक ओलेती
गंध मातीचा घेऊन
एक थेंब झेलण्याला
शिंप बसली उलून.

कोंभ कोंदलें बीजांत
मन मौनांत व्याकूळ
वांझ जखमा आकाशा
वेणा मातीच्या निष्फळ.

१९५९

# फुगे

फुटतील फुगे
        पोकळ आश्वासनांचें
म्हणून . . .
द्यावेत भरवसें
        सोनेरी भवितव्याचें

स्वप्नांचें चंदेरी कलाबतूं
        गुंफावें
        निराशेच्या काळचाशार
        अंधेऱ्या रेशमांत

विणावा गोफ
        आवळावा फास
        मोकाट सुटणाऱ्या
        उद्दाम उद्विग्नतेला . . .

आणि डागावी तोफ
        करीत जयजयकार
        नव सृजनाचा
वांझोटीच्या वेणा, नराचा पान्हा
शिखंडी संभोग, भविष्य तान्हा.

१९५९

# विळखे

वाटेचे विळखें
काळोख डोंगरा
पर्वत पसारा
अस्ताव्यस्त.

गुंडाळिता मार्ग
फिरतो भोवती
चालण्याची मिती
मुंगीवाणी

वाटते चाललो
कित्येक योजने
वरती चढणे
दुरापास्त

तीच ती पातळी
तेंच धपापणे
उरांत फुटणें
विश्वासाचें

भोवळ भोवळ
फिरतें गगन
पायतळीं मन
मूर्छावतें.

भोगून मरणें
क्षणोक्षणीं, जिणे
उठून चालणे
अज्ञातांत.

चालणेच झाले
स्वभावाचा धर्म
कळेलच मर्म
पल्याडचें.

१९५९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. C0C6

# अनोळखी वाटा

अनोळखी वाटा
काळोखाच्या लाटा
आकाशाच्या काठा
काजळलें.

तम अमर्याद
अथांग अज्ञात
खद्योताची ज्योत
चंद्रावरी.

युगांचा प्रवास
मानवेतिहास
जिज्ञासेचा आस
झिजेचना.

अखंड भ्रमण
काल आवर्तन
उमलें जीवन
अणूंतून.

फिरते अजून
कुंभाराची काठी
अंधारते दिठी
बघतांना.

अंधार, अंधार
गर्भातील वास
अंतरावकाश
स्फुल्लींगावें.

१९५९.

# नातें

मनास पटलें अपुलें नातें
रक्त परी हें अडून बसतें
अहंपणाच्या फुग्याभोवती
फुरंगटोनी रुंजि घालतें.

उगिच असें हें हटवादीपण
सामर्थ्याची शेखी मिरवित
परस्पराला नमवूं बघतें
जखमांवरच्या खपल्या काढित.

आंत खांत परि ओढ अनावर
नाजुक कांहि तोडु लागते
पिळवटून मन निघतां निघतां
दृढतर होतें अपुलें नातें.

१९६०

# विरहिणी

उघडी निंबाची खांदी
खालती पडकी सांदी
धनी गेले परदेशा
करून नजरबंदी.

बेंदली कोंबडी आंत
तिला कुणाची न साथ
दिन उजाडला तरी
अंधार उचली हात.

भोवती कुंपणावरी
बसल्या मिठ्ठूंच्या हारी
वाट पाहून पाहून
पिकली तोंडली सारी.

वावरांत हरभरा
भरला दाणा टपोरा
खाराने भरती हात
झोंबतो चुरचुरा.

काकड थंडीमधून
शहारें कोवळें ऊन
स्पर्श आठवे धन्यांचा
ऊर फुटतो भरून.

माझी ग ओसरी ओस
जिवाला जाळिते आस
पान वाढिलें समोर
हातांत अडतो घास.

१९६०

# पालवी

असा पेटला उन्हाळा
        आग लागे अंतराळा
माझ्या प्राणांचा फुलोर
        कसा निष्फळ वाळला
फुलें पाहणारी दीठ
        कोळजून अंधारली
गंध देणारी सारीच
        अवघ्राणें हारपली
कशी मापावी आतां मी
        आकाशाचीं लांबी रुंदी
माझ्या भोवती अंड्याच्या
        कवचाची तटबंदी.

गुहेमधील मानवा
        गर्भाशयाचा अंधार
रंग उषेचें तांबडें
        लाल जळता अंगार
तिथें गुहेत अनादी
        सूर, बोल अंकुरती

आणि मानवाच्या पोटीं
        मर्त्य अमर जन्मती

तसें उगवेल कधीं
        ज्ञानबीज तुझ्या रूपें
आणि लागतील हातां
        गूढांची अवघ्या मापें
विनाशाच्या कोलाहलीं
        तेव्हां गवसेल सूर
वाळवंटीं वाहणारी
        सरस्वती सूप्त धार
ओघ तोच शमवील
        तृषा युगांची मानवी
माझ्या प्राणांना फुटेल
        पुन्हां कोवळी पालवी.

१९६०

# इथेंच रहा

सये ! तिथें जाऊ नकोस
त्याच्यासवें निळ्या नभांत
इथेंच रहा.

तोडूं नकोस येथील सारे
निंबाच्या झाडावरील
कोवळ्या तंतूच्या वेलाची
नाजूक जाळी
बाभळीच्या फुलांची
छायांच्या केसांतील
वेणी पिवळी.

विसरलीस का ?
गात होतों गीत आपण
गोवऱ्या थापतांना . . . .
'चांदणी निघाली घुंगुर बांध
बावडीचें पाणी पाटाशीं सांध'

जाऊं नकोस, जाऊं नकोस
तूंच आहेस
हातांचें स्नायू, कंकणगीत
इथेंच रहा, इथेंच रहा.

१९६०

# प्रतीक्षा

कधीचा असा मी बसलो आहे
क्षितिज्याशीं टेकून
येशील तूं, येशील तूं म्हणून
तुझ्या वाटेवर दृष्टी लावून.

पण अजून
तुझ्या पावलांच्या वादळ खुणा
अंधुकशाहि कशा दिसत नाहीत !
एवढेसें पान थरकलें कीं
वेडावणारे पुष्कळ आहेत.
तसला पिसाट मुळीच नाही मी.

झपाटून जाईल अस्तित्व सारें
अवघें अंतर्यामच
मुळापासून हादरून जाईल
असली धुंद हवी आहे मला
तिचा उन्माद कसा असतो
माहीत आहे
वणव्याने भडकणाऱ्या अरण्याला

झंझावाताने उफाळणाऱ्या सागराला
उभ्या उभ्या वीज भोगून
भस्म होणाऱ्या महावृक्षाला.

म्हणून तर तुझी वाट बघतो आहे
एका हाताने धरून थोपवून
मृत्यूला
त्याच एका क्षणासाठी
मीलनाच्या प्रलयासाठी
कधीचा असा क्षितीजाशी टेकून
तुझ्या वाटेवर दृष्टी लावून.

१९६१

## प्रश्न

कळीचा हुंदका ऐकला आहे का कधी तुम्ही ?
दंवबिंदू दिसतात सगळ्यांनाच
त्यांचा चटका मात्र जाणवतो थोड्यांनाच
आणि त्यांतील सुख !
ती तर असते ठेव साऱ्या जन्माची
देव घेव मात्र विसरून जा
तेव्हां नुसते पसरायचे असते
सारी बंधनें तोडून
दिशांची, क्षितिज्याची, काळाचीसुद्धां
लुटून गेलेले वेडेपीर ! कुठें आहेत ?
कुठें आहेत ?

१९६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 31903 वि: काव्य
क्रमांक 1458 नों दि: 5/1/62

# अचानक........

अचानक तयार होतो संभाषणांत एक समुद्र
आणि कल्पनेतसुद्धां पुलाचें अस्तित्व
अशक्य वाटतें, तुटतें दळणवळण आरपारच्या
किनाऱ्यांतील, दीपगृहांच्या वीजदिव्यांतील
तारांची फुलें अजून कशी उमलत नाहीत !
प्रकाशगंधाने तुला, मला कांही सांगितलें असते
दोन किनाऱ्यांना एका धाग्याने जोडलें असते
पण ह्या तुटल्या अंतराचा दुवा
ताणूनसुद्धां सांधत नाही .....
ह्या ज्या लाटा मला इथें भिजवत आहेत
त्याच मागे जात जात तुझ्याजवळ पोचतील काय ?
माझ्या कानाशीं संध्यागीत गुणगुणणाऱ्या ह्या सावल्या
तरंगत तरंगत हवेवरून तुझ्याजवळ येतील काय ?
तुला धीर देईल काय ? तेंच गीत गातील काय ?
तुझ्या माझ्या किनाऱ्यांच्या क्षितीजाला
जोडणाऱ्या आकाशाचें, तुझ्या माझ्या सामर्थ्याचें
तुझ्या माझ्या वेदनांचें, एकजीव अवकाशांचें
तेंच गीत गातील काय ?

१९६१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
दा. क्र. C0C6

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | ४ | कृत्रीम | कृत्रिम |
| २ | ८ | निलिमा | नीलिमा |
| १० | ३ | वायुविचितिल | वायुवीचितिल |
| १४ | ५ | नाहि | नाही |
| १४ | ५ | कधिहि | कधीहि |
| १४ | १३ | तरिहि | तरीहि |
| १५ | १ | तूंहि | तूंही |
| ६० | २ | क्षितिज्याशी | क्षितिजाशीं |
| ६२ | ९ | क्षितिज्याची | क्षितिजाची |
| ६३ | १४ | देईल | देतील |
| ६३ | १५ | क्षितीजाला | क्षितिजाला |

ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
क्रम 32903 वि: काव्य
क 9486 नों दि: 4/9/62
REFBK-0008087
REFBK-0008087
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. 6066